क्रमांक : ८०

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

**मंगळवार, दिनांक १९ मे, २०२६/वैशाख २९, शके १९४८**

८०. सर्व सन्माननीय सदस्यांना याद्वारे कळविण्यात येते की, श्री. अर्जुन खोतकर, विधानसभा सदस्य प्रतिनिधीत्व करत असलेल्या जालना मतदारसंघामध्ये जालना शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ९ मध्ये सुमारे ४६ लाख रुपयांच्या विकास कामांचा शुभारंभ व लोकार्पण सोहळा दिनांक ९ मार्च, २०२६ रोजी आयोजित करण्यात आला असून उक्त कार्यक्रमामध्ये राजशिष्टाचार नियमांचे उल्लंघन करुन विद्यमान लोकप्रतिनिधींना हेतुपुररसर वगळण्यात आल्याने श्री. अर्जुन खोतकर, विधानसभा सदस्य यांनी आयुक्त, जालना महानगरपालिका यांचेविरुध्द दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी दिलेली विशेषाधिकार भंग व अवमानाची सूचना मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम २८४ मधील तरतूदींच्या अधीनतेने स्वेच्छानिर्णयाने विधानसभा विशेषाधिकार समितीकडे तपासणीसाठी व अहवाल सादर करण्यासाठी दिनांक १५ मे, २०२६ रोजी सुपूर्द केली आहे.

---

**विधान भवन,**<br>
मुंबई.<br>
दिनांक : १९ मे, २०२६

**जितेंद्र भोळे,**<br>
सचिव -१,<br>
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व मा.सदस्य.<br>
२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव<br>
३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी<br>
४) विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये<br>
५) संगणक कक्ष<br>
६) MKCL कक्ष